देशोन्नती दि. 15/02/2023

# उस्माननगर हद्दीत जबरी चोरी करणारे तीन आरोपी अटकेत

## स्थानिक गुन्हे शाखा व उस्माननगर पोलीसांची संयुक्त कार्यवाही



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ मारतळा ते कापसी मार्गावर फायनान्सच्या कर्मचाऱ्यास चाकुचा धाक दाखवून ३० हजार ७३० रुपये नगदी रक्कम ठेवलेली बॅग लंपास करणाऱ्या तीन चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखा व उस्माननगर पोलिसांनी संयुक्त कारवाई करून अटक केली.

मारतळा ते कापसी जाणाऱ्या मार्गावरील कापसी शिवारात सोमान फायनान्स सर्व्हिस प्रा.लि. नांदेडचे कर्मचारी गोपाळ मुरसेटवार हे ३ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी फायनान्सची वसुली करुन जात असताना, दोन मोटार सायकलवर आलेल्या चार चोरट्यांनी त्यांना चाकुचा धाक दाखवुन त्यांचेजवळील ३० हजार ७३० रुपये ठेवलेली बॅग बळजबरीने हिसकावुन नेली होती. सदर प्रकरणी पोलीस ठाणे उस्माननगर येथे गुरनं १४१/२०२२ कलम ३९२,३४ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल होवुन सदर गुन्ह्याचा तपास सुरु होता.

सदर गुन्ह्यांचे अनुषंगाने १४ फेब्रुवारी रोजी स्थागुशाचे पोनि व्दारकादास चिखलीकर यांना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार सदरचा गुन्हा धोडींबा ऊर्फ बबलु टोम्पे रा.पांगरी ता. नांदेड व त्याच्या साथीदारांनी मिळुन केल्याचे समजले. सदर माहितीवरुन आरोपी धोडींबा ऊर्फ बबलु टोम्पे यास पकडुन विचारपुस केली असता, त्याने त्याच्या इतर चार साथीदारासोबत मिळुन सदरचा गुन्हा केला असल्याचे सांगीतले असुन इतर साथीदारापैकी आरोपी नोमान खान इब्राहिम खान रा.उमरकॉलनी नांदेड , गौतम माधव कांबळे रा.कापसी ता.लोहा यांना पकडले असुन सदर तिनही आरोपीतांना पुढील कायदेशिर कार्यवाहीकामी पोलीस ठाणे उस्माननगर यांचे ताब्यात दिले आहे. सदर आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. कारवाई केलेल्या या पथकात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, खंडेराव धरणे, उपविभागीय पोलिस अधिकारी मारोती थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोनि व्दारकादास चिखलीकर, सपोनि पांडुरंग भारती, सपोनि पांडुरंग माने, पोउपनि जसवंतसिंघ शाहु, प्रभु केंद्रे, पोकॉ तानाजी येळगे, मोतीराम पवार, शेख जावेद, व्यंकट गांगुलवार, गंगाधर घुगे यांचा समावेश होता.